दै. देशोन्नती दि. 22.09.25

# बोंढार बायपास मार्गावर लुटमार करणाऱ्यांच्या मुसक्या 'स्थागुशा'ने आवळल्या

देशोन्नती वृत्तसंकलन

## ९५ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड :** बोंढार बायपास मार्गावर बोलत थांबलेल्या दोघांना मोटारसायकलवर आलेल्या पाच ते सहा जणांनी चाकुचा धाक दाखवून त्यांच्याकडील नगदी ३४ हजार ५०० रुपये घेऊन पोबारा केल्याची घटना १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी घडली. यातील चौघांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून ९५ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बोंढार बायपास मार्गावर माधव आरसुळे व त्याचे साथीदार १९ सप्टेंबर रोजी गप्पा मारत बसले होते. सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास तीन मोटारसायकलवर आलेल्या पाच ते सहा जणांनी जवळ येवून चाकुचा धाक दाखवून मारहाण केली. यावेळी आरसुळे व त्यांच्या साक्षीदाराच्या खिश्यातील नगदी ३४ हजार ५०० रुपये घेवून पोबारा केला. या प्रकरणी संभाजी आरसुळे यांनी



दिलेल्या फिर्यादीवरुन लिंबगाव पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल केला.

दरम्यान पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरुन स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि मिलींद सोनकांबळे, महेश कोरे व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी २४ तासाच्या आत शिवम उर्फ चिक्क्या वडजे, गोविंद गच्चे, शेख शारुख उर्फ कबुतर शेख असगर व जयकुमार उर्फ सोनु राऊत यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून एक मोटारसायकल, दोन खंजर व नगदी २४ हजार ५०० रुपये जप्त केले.